**नि.फौ.प्र. क्र. १०५/२०२४**
**शासन—वि—मिना**
**नि.क्र. ११**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी :—
मी याव्दारे शपथेवर कथन करते की —

माझे नांव :— शिवकुमार मर्जी जाधव
वय :— ५८ वर्षे, धंदा :— व्यवसाय,

राहणार :— निगडी, पुणे.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्री. एस. के. राठोड यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

आरोपी माझी धाकटी बहिण आहे. घटना ही दि. १५.११.२०२२ रोजी सकाळी ०८.०० ते ८.१५ चे सुमारास सेक्टर नं. २५, सिंधुनगर, एल.आय.सी. कॉलनी येथिल आझाद हेअर सलुन येथे घडली होती. घटनेचे वेळेस आझाद हेअर सलुनचे मालक नुर मोहम्मद व त्यांचा मुलगा यांचे दुकान उघडली होती तेव्हा आरोपी ही नुर मोहम्मद यांचेसोबत ही दुकान माझी आहे व मी ताबा घ ोणार आहे अेस म्हणुन ओरडत होती व येणारे ग्राहकांना दमदाटी करुन हाकलुन देत होती. घटनेनंतर नुर मोहम्मद यांनी आरोपी विरोधात तक्रार दिली व तपासादरम्यान पोलीसांनी माझे बयाण नोंदविले आहे.

२. मी आरोपीला ओळखतो ती आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**साक्षीदार यांचा उलटतपास आरोपीतर्फे स्वत: शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की अभिकथित दुकानाची जागा माझे नावाने नाही. हे म्हणणे खरे नाही की सदरचे दुकानाचे विदयुत मिटर हे माझे नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे की आमचे आईने वाटणी पत्र लिहुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की वाटणीपत्रानुसार दहा दहा वर्षासाठी जागा देण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी नुर मोहम्मदचे सदरचे जागेवर भाडयाने राहण्याचा कोणताही करार नाही. अभिकथित दुकान माझे मालकीचे असल्याबद्दल मी तपासादरम्यान कागदोपत्री पुरावा मी दिला होता. हे म्हणणे खरे नाही की मी फिर्यादीला पुढे करुन खोटे रचुन आरोपीला त्रास देण्याचे उद्देशाने सदरची केस करण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी

खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले —समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.02.10 15:56:58 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि.१०.०२.२०२५

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.02.10 15:57:01 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती किर्ती उदय पवार |
| न्यायालयाचे नांव | : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे. |
| न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक | :१०/०२/२०२५ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक | :१०/०२/२०२५ |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : १०/०२/२०२५ |

स्वाक्षरीत/–

लघुलेखक(श्रेणी–iii)